**तक्रारदारातर्फे सा. क्र. २**

**नाव** – ईश्वर बंडू शिवणे.

**वय** – ५७ वर्षे, **व्यवसाय** – शिक्षक,

**रा.** – आर्दाळ, ता. आजरा, जि. कोल्हापूर.

**तक्रारदारातर्फे सरतपास – श्री. जी. टी. ठाकूर वकील.**

**१.** मी तक्रारदार व गैरअर्जदारांना ओळखतो. तक्रारदार हा सध्या आंतरभारती संस्थेचा सचिव म्हणून काम करतो. गैरअर्जदार उत्तूरचा रहिवासी असून त्याचा आंतरभारती संस्थेशी कोणताही संबंध नाही. दि.२९.०९.२०२१ रोजी गैरअर्जदाराने लेखी पत्रकार परिषद घेऊन तक्रारदाराची बदनामी होईल असा मजकूर सादर केला होता.

**२**. त्याबाबतचा संदेश त्याने समाजमाध्यमावरती व्हॉटस्ॲप द्वारे प्रसारीत केला होता. तो मजकूर दि.३०.०९.२०२१ रोजीच्या दैनिक लोकमत मध्ये प्रसारीत झाला होता. मी तो संदेश व्हॉटस्ॲप ग्रूपचा सभासद असल्यामुळे वाचला होता. त्यानंतर मला काही लोकांनी तक्रारदारा बाबत विचारले होते. गैरअर्जदाराने तक्रारदार यांच्याबाबत ते सभासद नसून संस्थेचे सचिव असल्याचे भासवून लोकांची दिशाभूल करत असल्याचा तसेच त्यांच्या कालावधीत शाळेच्या तुकडया व विद्यार्थीसंख्या कमी झाल्याचा आरोप केला होता.

**३**. त्यामध्ये अनंतरराव आजगावकर यांची संपत्ती तक्रारदाराने लाटली असा उल्लेख केलेला होता. त्यावरुन तक्रारदाराची बदनामी केली होती.

**समक्ष,**

**साक्षीदाराची सही.**

Digitally signed by RAVI PANDURANG THORE

**(आर. पी. थोरे)**

दिनांक – ११.०८.२०२५. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, आजरा.